# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/05/2023 (शनिवार) दुपार

---

## जबरी चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील रिलायन्स रेल्वे लाईन पूल MIDC बोरी येथे दि. १९/०५/२०२३ चे १५.२० वा. ते १५.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– अमित भयाम सुंदरभैया वय ४२ वर्ष रा. गांधीबाग जागनाथ रोड नागपुर ता. हिंगणा जि. नागपूर हा मित्रा कडुन नेहमी एमआयडीसी बोरी येथे प्लास्टीक कंपनीतुन बारदाना माल विकत घेतो. फिर्यादी हा सिंटेक्स कंपनी मांडवा येथे बारदाना घेण्यासाठी जात असतांना टाकळघाट ते रिलायन्स रेल्वे पुलाच्या खाली यातील फिर्यादी हा आपल्या मोटरसायकल क्र. एम. एच.– ३१ डी वाय– ४७७७ ने जात असतांना पुलाखाली ०३ अनोळखी इसम अचानक समोर आले त्यातील एका इसमाने फिर्यादीला चाकु दाखवला दुसऱ्या मुलाने त्याच्या गळयावर कटर लावला आणि तिसऱ्या मुलाने त्याच्या डाव्या खिशातील नगदी ५०,०००/–रू काढले व चौथा मुलगा हा गाडी घेवून उभा होता दुसऱ्या नंबरच्या मुलाने टायटनची घडयाळ काढली असा एकुण फिर्यादीच्या जवळुन ५१,५००/– रू मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९२, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि बोरकुटे पो.स्टे. एमआयडीसी बोरी मो. नं. ९५४५६६७२२३ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत मुर्तीरोड धंतोली काटोल येथे दिनांक १८/०५/२०२३ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– योगेश विठ्ठलराव पांडे, वय ६६ वर्ष रा. मुर्तीरोड काटोल हे त्यांचे परीवारासह बाहेरगावी गेले असता यातील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले नगदी २०००००/– रूपये ( दोन लक्ष रूपये ) चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दत्तात्रय कोलटे मो. क्र. ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**